महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,मुरुड जिल्हा लातूर

फोन क्र:-०२३८२-२७०२७३ E-mail :-dietlatur@maa.ac.in

जा.क्र./जिशिवप्रसंमू/शिक्षक स्पर्धा/ २०२५-२६/ दिनांक:- २९/१० /२०२५

**प्रति**,
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना) जि.प. सर्व
गटशिक्षणाधिकारी, पं.स., (सर्व),
प्रशासन अधिकारी, मनपा, नपा, न.प., (सर्व),

विषय : **शिक्षक व अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी बोर्ड स्पर्धा परीक्षा या स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत...**

संदर्भः १.राष्ट्रीय शिक्षण धोरण - 2020
२.राज्य अभ्यासक्रम आराखडा 2024
३.शासन निर्णय क्र. संकिर्ण 2024/प्र.क्र.10/एसडी- 6 मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च, २०२४ (SQAAF),
४.मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. राशैसप्रप/शिक्षक स्पर्धा / २०२५२६, दिनांक: १०/१०/२०२५
५.मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या ऑनलाईन बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, **DIET** मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्य स्तरावर विविध स्पर्धाचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धाच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर

पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ह्या संस्थेच्या **www.maa.ac.in** ह्या संकेतस्थळावर **उपयुक्तः** या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आमच्या जिल्हासाठी **बोर्ड स्पर्धा परीक्षा** हा विषय स्पर्धेसाठी देण्यात आलेला आहे.

**सदरील स्पर्धेचे स्वरूप व नियमावली खालील प्रमाणे**

1. **विषयः** विज्ञान, गणित, सामजिकशास्त्र,भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी),शिक्षक अभियोग्यता,सामान्य ज्ञान
   (इयता 1 ली ते 12 पर्यंत च्या संकल्पानावर आधारित)
2. **परीक्षा प्रकार**: लेखी परीक्षा (100 बहुपर्यायी प्रश्न ) एकूण 100 गुण.
3. माध्यम : मराठी भाषा
4. ऋण गुणदान पद्धती : 1 चुकीच्या प्रश्नासाठी ½ गुण कपात होतील.
5. तालुकास्तर स्पर्धा दिनांक 29 नोव्हेंबर 2025 रोजी एकाच वेळी संपूर्ण राज्यात होतील.
6. परीक्षा सकाळी 11 ते 01 वाजता घेण्यात याव्यात.
7. प्रश्नपत्रिका व उत्तरसूची प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,यांना वैक्तिक परीक्षेच्या अगोदर देण्यात येतील.
8. तालुकास्तर निकाल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी संकलित करून विभागीय डाएट / RAA त्याच दिवशी कळवतील.
9. 25 स्पर्धकांचा एक वर्ग करण्यात यावा.एका वर्गास एक पर्यवेक्षक नियुक्त करावा तोच पर्यवेक्षक पेपर तपासून गुणदान करेल.
10. प्रश्नपत्रिकेच्या pdf सोबत स्वतंत्र सूचना पत्रक देण्यात येईल.

**बोर्ड परीक्षांचे नियम आणि अटी:**

1. शिक्षकांचे अधिकृत ओळखपत्र बरोबर ठेवणे अनिवार्य आहे.
2. शिक्षकांना / कर्मचाऱ्यांना शालार्थ ID/ सेवार्थ ID असणे आवश्यक आहे.
3. शिक्षकांना परीक्षेसाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे.
4. पूर्व नोंदणी नसलेल्या स्पर्धकांना प्रवेश देण्यात येऊ नये.
5. सक्षम पर्यवेक्षक / परीक्षक निवडावेत.

(डॉ.मारुती सलगर )
प्राचार्य
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** ,**मुरुड,**
**ता.जि.लातूर**